श्री नेत्रालय हॉस्पिटल
नवीन जागेत
विश्वकर्मा कॉम्प्लेक्स, १ ला मजला, दत्तमंदिर चौक, देवपूर, धुळे
- कॉम्प्युटरच्या सहाय्याने डोळे तपासणी व उपचार
- फेको पद्धतीने व बिनटाक्याच्या पद्धतीने माफक दरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येईल.
- तपासणी वेळ : संध्या. ४ ते रात्री ९ पर्यंत
मो.नं.९५१८३९७५९२ / ९४२१५१७६६३

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

POST REGD.No./DHL/53/24-26

संयुक्त वर्ष ६८ ■ अंक क्र.१०४ ■ रविवार १९ जानेवारी २०२५ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ८

उत्कृष्ट क्वालिटी
खारिक २००/- रु.किलो
खोबरा २४०/- रु.किलो
गावरानी तिळ १६० रु.किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

## महिला डॉक्टर बलात्कार-खून प्रकरणात रॉय दोषी
## उद्या होणार शिक्षेची सुनावणी; संपूर्ण देशाचे लक्ष

**कोलकाता, दि.१८- मागच्या वर्षी ऑगस्ट महिन्यात कोलकाताच्या आर.जी. कर महाविद्यालयातील ट्रेनी डॉक्टरवर बलात्कार आणि खून केल्याप्रकरणी सियालदह सत्र न्यायालयाने आज मुख्य आरोपी संजय रॉयला दोषी ठरविले. आता सोमवारी (दि.२०) संजय रॉयला काय शिक्षा मिळते, याची घोषणा केली जाईल. सत्र न्यायालयाचे न्यायाधीश अनिर्बन दास यांनी हे प्रकरण सुनावणीस घेतल्यानंतर सत्तावन्न दिवसांनी निर्णय सुनावला आहे.**

यावेळी दास यांनी संजय रॉयला दोषी ठरविताना सांगितले की, तुला शिक्षा मिळायलाच हवी. कोलकातामध्ये सदर घटना घडल्यानंतर देशभरात या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला होता. कोलकाता पोलिसांचा नागरी स्वंयसेवक म्हणून काम करणाऱ्या संजय रॉयने गुन्हा केल्यानंतर दुसऱ्या दिवशी ९ ऑगस्ट २०२४ रोजी त्याला अटक करण्यात आली होती. आज सुनावणी झाल्यानंतर न्यायाधीशांनी सांगितले की, आम्ही सर्व पुरावे आणि साक्षीदार तपासले आहेत. तसेच वकिलांचा युक्तिवादही ऐकला. या सर्वांच्या आधारे आरोपी दोषी असल्याचे सिद्ध होते. त्यामुळे त्याला शिक्षा झालीच पाहीजे.

सत्र न्यायालयात सुनावणीदरम्यान आरोपी संजय रॉयने प्रश्न विचारला की, ज्यांनी मला फसवले, त्यांना का सोडले जात आहे? यावर न्यायाधीशांनी सोमवारी त्याच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकणार असल्याचे सांगितले. तोपर्यंत संजय रॉयची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आली. संजय रॉयचा इशारा आर.जी. कर



महाविद्यालयाचे प्राचार्य संदिप घोष यांच्याकडे होता. ज्यांना पुराव्यात फेरफार केल्याप्रकरणी अटक करण्यात आली होती. मात्र कालांतराने त्यांना जामीनावर सोडण्यात आले.

कोलकाता येथील आर.जी. कर रुग्णालयात (पान ८ वर)

## दहावी-बारावीच्या हॉल तिकिटावर जातीचा उल्लेख

मुंबई, दि.१८- महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येणाऱ्या फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या दहावी-बारावीच्या (एसएससी आणि एचएससी) परीक्षेच्या हॉल तिकिटावर आता विद्यार्थ्यांच्या जात प्रवर्गाचा उल्लेख करण्यात आला आहे. हॉल तिकिटावर जात प्रवर्गाच्या उल्लेखानंतर शिक्षण क्षेत्रातील अनेकांनी, तसेच शिक्षणतज्ज्ञ आणि शिक्षकांकडून बोर्डाच्या या निर्णयावर नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. दरम्यान, राज्यात सध्या जाती-धर्मावरून वातावरण गढूळ झाले आहे, असे असताना विद्यार्थ्यांच्या हॉल तिकिटावर जातीचा उल्लेख करण्यात शिक्षण विभागाचा काय उद्देश असा सवाल उपस्थित केला जात आहे. (पान ८ वर)

## धुळ्याचे पालकत्व रावलांकडे, नंदुरबारला कोकाटे पालकमंत्री
## पालकमंत्र्यांची यादी जाहीर; बीडची जबाबदारी अजितदादांकडे

**मुंबई, दि.१८- राज्य सरकारकडून पालकमंत्र्यांची पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पुणे आणि बीडच्या पालकमंत्रिपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. गेल्या अनेक आठवड्यांपासून पालकमंत्रिपदाचा मुद्दा चर्चेत आला होता. विशेष म्हणजे पालकमंत्रिपदाच्या यादीतून मंत्री धनंजय मुंडे यांचा पत्ता कट करण्यात आला आहे. धुळे जिल्ह्यासाठी मंत्री जयकुमार रावल तर नंदुरबारसाठी मंत्री ॲड.माणिकराव काकाटे यांची पालकमंत्रीपदी नियुक्ती झाली आहे.**



शिक्षणमंत्री दादा भुसे यांना तूर्तास कुठल्याही जिल्ह्याची जबाबदारी देण्यात आलेली नाही. गडचिरोलीचे पालकमंत्री पद मुख्यमंत्र्यांकडे तर बीड आणि पुण्याचे पालकमंत्रीपदी अजित पवार यांच्याकडे देण्यात आले आहे. मुंबई शहर आणि ठाण्याचे पालकमंत्री पद एकनाथ शिंदेकडे तर नागपूर आणि अमरावतीचे पालकमंत्री पदी चंद्रशेखर बावनकुळे असतील. छ.संभाजीनगर पालकमंत्री पद संजय शिरसाट यांच्याकडे तर पंकजा मुंडे यांच्याकडे जालन्याचा कारभार पाहणार आहेत. मुंबई उपनगराचे पालकत्व आशिष शेलार व मंगलप्रभात लोढा सहपालकमंत्री असणार आहेत. मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर पालकमंत्री पदाची जबाबदारी नाही. बहुचर्चित नाशिकच्या पालकमंत्री पदाची धुरा अखेर गिरीश महाजन यांच्याकडे देण्यात आली आहे.

पालकमंत्र्यांची संपूर्ण यादी- गडचिरोली - अजित पवार, ठाणे - एकनाथ शिंदे, मुंबई शहर - एकनाथ शिंदे, पुणे - अजित पवार, बीड - (पान ८ वर)

## प्रसाद चौधरीला सोमवारपर्यंत पो.कोठडी; चार मोबाईल मिळाले

**धुळे, दि.१८- मोबाईलचे कर्ज काढून सर्वसामान्य जनतेच्या फसवणूक प्रकरणातून आतापर्यंत महागडे पाच मोबाईल हस्तगत करण्यात धुळे एल.सी.बी.ला यश आले आहे. फायनान्स कंपनीचा सेल्स ऑफिसर प्रसाद सज्जन चौधरी यास सोमवारपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.**

फायनान्स कंपनीचे पुर्वी घेतलेले कर्ज वेळेत फेडले हे माहीत असल्याने फसवेगिरी करणाऱ्यांनी सर्वसामान्य गोर-गरीब जनतेला गाठून कंपनीतर्फे तुम्हाला पंधराशे रुपयांचे बक्षीस दिले जाणार आहे. तुम्ही केवायसी करुन घ्या असे सांगून नवीन महागड्या मोबाईलची खरेदी व संबंधीतांवर कर्ज चढवण्यात आले. सुरुवातीचे दोन हप्ते फसवणूक करणाऱ्यांनी भरले. मात्र जेव्हा लोकांच्या खात्यावरुन फायनान्स कंपनीचे पैसे कापले जात आहेत हे लक्षात आल्यावर फसवणुकीचा प्रकार उघड झाला. हे महागडे मोबाईल फसवणुकी मध्ये सहभागी असणाऱ्यांनी परस्पर दुसऱ्यांना विकले. मोबाईल सील असल्याने व दुसऱ्याच्या नावाचे बील बघण्यास मिळाल्याने त्याची विक्री करणे सोपे झाले. काही प्रकरणामध्ये दुकानदारांनी हे मोबाईल तालुका पातळीच्या दुकानदारांना विक्रीसाठी देवून त्यांनी त्यांच्या पावत्यांच्या आधारे विक्री केली व पैसा फसवणूक करणाऱ्या टोळक्याला मिळाला.

गेल्या काही दिवसापासून सापडत नसलेला प्रसाद सजन चौधरी हा फायनान्स कंपनीचा प्रतिनिधी पुणे येथून धुळ्यात आला असता त्यास एलसीबीने अटक केली. आज त्याला धुळे न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने येत्या सोमवारपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. यावेळी झालेल्या युक्तीवादात प्रसाद सजन चौधरी यांच्या वकिलांनी सदरचे मोबाईल दुकानदारांना विकले असल्यान आमचा त्याच्याशी संबंधी नाही आदी मुद्दे उपस्थित केले. फसवणूक झालेल्यांतर्फे ॲड.चैतन्य मोहन भंडारी यांनी प्रसाद सजन चौधरी हा यामधील (पान ८ वर)

## गावातील प्रत्येक मालमत्तेचा मिळेल डिजिटल नकाशा
## नंदुरबारमध्ये केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसेंची माहिती

**नंदुरबार, दि.१८ (प्रतिनिधी)- स्वामित्व योजनेंतर्गत देशातील ग्रामीण भागातील जमिनींचे ड्रोनद्वारे मोजमाप केले जाईल आणि गावातील प्रत्येक मालमत्तेचा डिजिटल नकाशा तयार होण्याबरोबरच उपलब्ध कागद पत्रांच्या पुराव्यानुसार, संबंधित मालकाला, शेतकऱ्याला त्याच्या जमिन मालकीचे ई-प्रॉपर्टी कार्ड दिले जाईल, अशी माहिती केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी दिली आहे.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज देशभरात ५० लाख मालमत्ता पत्रकांचे आभासी वितरण करण्यात आले त्यात नंदुरबार जिल्ह्यातील २९ गावांना केंद्रीय युवा व्यवहार व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात प्रत्यक्ष वितरण करण्यात आले. त्यावेळी केंद्रीय मंत्री रक्षा खडसे बोलत होत्या. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सावनकुमार, अप्पर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, माजी जि.प.अध्यक्षा डॉ.सुप्रिया गावित, माजी खासदार डॉ.हिना गावित, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) उदयकुमार कुसुरकर, नोडल अधिकारी जिल्हा अधीक्षक भुमि अभिलेख किरणकुमार पाटील, पदाधिकारी विजय चौधरी, निलेश माळी यांच्यासह २९ गावातील लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ उपस्थित होते.





यावेळी बोलताना केंद्रीय मंत्री श्रीमती खडसे म्हणाल्या, देशातील सर्वच भागात जमिनींच्या मालकी हक्काबद्दल नेहमीच विवाद उद्धवत असतात. तसेच, गरिबांच्या जमिनीवर जबरदस्तीने कब्जा केल्याची प्रकरणे देखील पहायला मिळतात. या सारख्या गोष्टींचा विचार करून देशाचे पंतप्रधान यांच्या संकल्पनेतून केंद्र सरकारने देशपातळीवर स्वामित्व योजना राबवली आहे. देशातील ग्रामीण भागात राहणाऱ्या अनेक लोकांकडे आजही आपले घर आणि जमिनीची कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नाहीत. त्यामुळे सरकारकडून ग्रामीण भागातील शेती, जमीन आणि घरांचे सर्वेक्षण ड्रोनद्वारे केले जाते. सर्वेक्षण केल्यांनतर त्यांना त्यांच्या मालकीच्या संपत्तीचे ओळखपत्र देण्यात येईल. जेणेकरून कागदपत्रे नसलेल्या लोकांनाही निवासी जमिनीच्या संपत्तीचे अधिकार मिळतील, असेही त्यांनी सांगितले.

**या गावांना स्वामित्व प्रमाणपत्र**

अक्कलकुवा- बि. अंकुश विहीर, घोटपाडा, शलटापनी, घुणशी, वीरपूर, व सिंगपुर बुद्रूक. तळोदा- मोहिदा, मोरवड, दलेलपूर, सिंगसपूर, व राणीपूर. शहादा- बिलाडी त.स., उंटावद, भडगांव, बुडीगव्हाण, चिरडे. नंदुरबार- पळाशी, खोडसगांव, ओझर्दे, खैराळे, वरूळ. नवापूर- कोठडा, वडखुट, अंठीपाडा, कडवान, तारापूर, बिलदा, नगारे व नावली.

## मंदाणे येथील श्री शाकंभरी मातेच्या यात्रोत्सवास प्रचंड प्रतिसाद ; दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी

**शहादा, दि.१८ (गिरधर मोरे)- तालुक्यातील मंदाणा येथील ग्रामदैवत असलेल्या शाकंभरी अष्टभुजा भवानी मातेचा यात्रोत्सव मोठ्या उत्साहाने सुरु झाला असून परिसरात नवचैतन्य निर्माण झाले आहे. देवीच्या दर्शनासह नवसपूर्तीसाठी भाविकांची अलोट गर्दी झाली होती. परिसरासह गुजरात, मध्यप्रदेशातील भाविक श्रद्धेपोटी चालत, वाजत गाजत कुलदैवतेला साखळे घालण्यासाठी येत आहेत.**

शाकंभरी अष्टभुजादेवीला शेतकऱ्यांनी धान्य व पाले भाज्यांचा नैवद्य दाखविला. त्यासाठी रीघ लागली होती. यात्रेत महाराष्ट्रसह राजस्थान, मध्यप्रदेश, गुजरात, बिहार, उत्तर प्रदेश आदी राज्यांतून सर्वधर्मीय व्यावसायिक दाखल झाले आहेत. त्यांनीही देवीचे दर्शन घेतले. श्री शाकंभरी अष्टभुजामातेची पौष पौर्णिमा दिवशी पहाटे चारला महापूजा व महाआरती सरपंच सुशीलाबाई पवार व सरपंच प्रतिनिधी पंडीत पवार, तसेच अहमदाबाद येथील पुरोहित अनिल शुक्ल यांनी सहपतकीक केली होती. सुरुवातीला प्रतिकाशी



येथून पवित्र तापी नदीच्या त्रिवेणी संगमावरून आणलेल्या जलाने मातेचा अभिषेक करण्यात येवून मंदिरावर ध्वज चढविण्यात आला होता.

मंदाणे येथील शाकंभरी अष्टभुजा देवीची आख्यायिका अशी की, मंदाणा हे सुमारे चारशे वर्षांपूर्वीस उदयास आलेले गाव. शहादाच्या पूर्वेस १८ किलोमीटर अंतरावर एक मोठं खेडेगाव. सरस्वती आणि मंदाकिनी नदी यांच्या संगमावर हे गाव वसलेले आहे. मंदाणे गावात ३०० वर्षापूर्वीचे हेमाडपंथी महादेव मंदिर देखील आहे.

इतिहासकार ग. ह. खरे यांनी येथे भेट दिली आहे. एका शिलालेखाच्या वचना प्रमाणे या ठिकाणी गड, किल्ला असल्याची नोंद आढळते. मोरे घराण्याची वतनदारी या ठिकाणी आहे. बाराशे - वर्षापूर्वीची विष्णू नारायणाची मूर्ती देखील येथे आढळून आलेली आहे. मंदिराच्या समोर मोठी दीपमाळ आहे. मंदाणे गावाला ऐतिहासीक व धार्मिक महत्त्व आहे. बहुदा मंदाकिनी नदीच्या नावावरून गावाला मंदाणे किंवा मंदाणा नाव पडले असावे असा अंदाज आहे. देवीचे अन्नपूर्णा स्वरूप म्हणजे (पान ८ वर)

## दोन ठिकाणी घरफोडी पोलिसात गुन्हा दाखल

धुळे, दि.१८- देवपूर भागात दोन ठिकाणी घरफोडी झाल्याचे आज सकाळी उघडकीस आले. मिळालेल्या माहितीनुसार, चोरट्यांनी मध्यरात्रीच्या सुमारास प्रभात नगरात डॉ.कुलकर्णी यांचे घर फोडले. डॉ.कुलकर्णी हे बाहेरगावी असल्याने त्यांच्या घराला कुलप होते. ही संधी साधत चोरट्यांनी हातसफाई केली. या घरातून किती रकमेचा ऐवज चोरीस गेला हे डॉ.कुलकर्णी आल्यावरच समजू शकणार आहे. तर भरत नगरजवळ असलेल्या नंदनवन कॉलनीत देखील चोरट्यांनी एक घर फोडले.



## शिरपूर-शहादा रस्त्यावर काटेरी झुडपे वाढली; वाहन चालक त्रस्त

**तऱ्हाडी, दि.१८ (प्रतिनिधी) - शिरपूर तालुक्यातील तऱ्हाडी तोरखेडा फाटा पर्यंतच्या रस्त्याची दुरुस्ती करण्यात येत नाही. रस्त्याचे काम अतिशय निकृष्ट झाले असून दोन्ही बाजूने साईडला झाडी झुडपे वाढल्याने अपघाताची भीती व्यक्त होत आहे.**

प्रामुख्याने रस्त्याच्या वळणावर अचानक गाडी समोरासमोर येवून अपघात होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. आजूबाजूला मुख्य रस्त्याच्या कडेला खड्डेच खड्डे पडल्याने अनेक वेळा वाहन पलटी होत असून, रात्रीच्यावेळी रस्त्यावरून प्रवास करणे एक प्रकाचे मृत्यूलाच आमंत्रण दिल्यासारखे आहे. शिरपुर ते शहादा रस्ता हा राज्य महामार्ग असल्याने मोठ्या संख्येने वाहन या रस्त्यावरुन जा ये करीत असतात. या मार्गावर दोन्ही बाजूंनी काटेरी झाडे मोठ्या प्रमाणात वाढल्याने वाहन चालकांना रात्री व दिवसाच्या वेळी अनेक प्राणी केव्हा गाडी समोरून (पान ८ वर)

सहावे पुण्यस्मरण
...विनम्र अभिवादन...



ॲड. निर्मलकुमार सूर्यवंशी

पवित्र स्मृतींची ज्योत तेवते
अखंड आमच्या मनी...
सुगंध तुमच्या आदर्शांचा
दरवळतो आमच्या जीवनी...
आठवुनी अस्तित्व, दिव्य, तव वृत्ती भारावली
कृतज्ञतेने आम्ही अर्पितो विनम्र श्रद्धांजली...

...शोकाकूल...
दै. आपला महाराष्ट्र परिवार
आणि स्नेहीजन, धुळे

## इले.मोटारीचा शॉक इसमाचा दुर्दैवी मृत्यू

धुळे, दि.१८- शेतातील विहिरीवर लावलेली इलेक्ट्रीक मोटार बंद करण्यासाठी गेलेल्या इसमाचा शॉक लागून मृत्यू झाला. ही घटना धुळे तालुक्यातील आंबोडे गावात शुक्रवारी सकाळी घडली. तालुक्यातील आंबोडे गावात रमेश थोरात आपल्या परिवारासोबत राहतात. गाव शिवारातच त्यांची शेती आहे. शेतात त्यांच्यासह त्यांचा परिवार काम करतात. शेतातील पिकांना पाणी देण्याचे काम शुक्रवारी सकाळी सुरु होते. शेतातील विहिरीत इलेक्ट्रीक मोटार सुरु होती. पिकांना पाणी भरुन झाल्याने मोटार बंद करण्यासाठी प्रदीप थोरात हा गेला होता. तो विहिरीजवळ गेल्याने त्याला शॉक लागला. शॉक जोराचा बसल्याने त्याचा ओरडण्याचा आवाज आला. आवाज (पान ८ वर)



## मंगल कार्यालय व्यावसायिकाची परिसरातील नागरिकांशी अरेरावी

**धुळे, दि.१८- देवपूर वाडीभोकर रोड परिसरातील दि.विजय पोलीस कर्मचारी सहकारी गृहनिर्माण हौसिंग सोसायटी लि. येथे व्यावसायिक गाळे, मंगल कार्यालय, जिम तसेच अवैध धंदे सुरू आहेत. रस्त्यावर वाहने लावली जात असल्याने परिसरातील नागरिकांना रहदारीला अडथळा होतो. या समस्येबाबत तक्रार केली असता कॉलनीतील सभासदाला जबर मारहाण केल्याने खाजगी रूग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार घेत आहेत. व्यावसायिकावर तत्काळ कारवाई करण्याची मागणी दि.विजय पोलीस कर्मचारी सह.गृहनिर्माण हौसिंग सोसायटीतील रहिवाशांनी मनपा आयुक्तांकडे केली आहे. याप्रकरणी आयुक्तांनी संबंधित विभागातील अधिकाऱ्यांना कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.**

मंगल कार्यालयात कार्यक्रमासाठी आलेली वाहने कॉलनीतील रस्त्यावर अस्ताव्यस्त लावण्यात येतात. वाहने व्यवस्थीत पार्कींग करा, असे सांगण्यास कॉलनीतील प्रकाश हेमंत पाटील हे गेले असता तेथील (पान ८ वर)

## चालक-विद्यार्थ्यामध्ये वादविवाद पानसमेल बस दिवसभर खोळंबली

**सोनगीर दि.१८ (प्रतिनिधी) - डांगुर्णे ता.शिंदखेडा येथे बस थांबवण्यावरून विद्यार्थी व पालक एसटी बसचे वाहक, चालक यांच्यात झालेल्या वादावरून शनिवारी दुपारी बस दोन तास थांबून ठेवण्यात आली होती. पोलीस व राज्य परिवहन महामंडळाचे अधिकारी यांनी मध्यस्थी केल्याने सदर वाद मिटला.**

शनिवार (दि १८) रोजी दुपारी धुळे येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिक्षण घेणारा डांगुर्णे ता.शिंदखेडा येथील रहिवाशी विद्यार्थी डांगुर्णे येथे जाण्यासाठी धुळ्याकडून दोंडाईचाकडे जाणाऱ्या धुळे-पानसमेल या बसमध्ये (एमएच १४ बीटी १७ ८९) धुळे येथून बसला. दरम्यान, नगाव गावाजवळ बस आल्यानंतर महिला वाहकाने सदर बस डांगुर्णे येथे थांबत नाही. तू बस मधून खाली उतर असे विद्यार्थ्याला सांगितल्यावरून विद्यार्थी व सदर चालक, वाहक यांच्यात वादविवाद झाले. यावेळी सदर विद्यार्थ्याला मारहाण झाल्याचा आरोप करण्यात आला. यावेळी बस मधून खाली उतरलेल्या विद्यार्थ्याने झालेला प्रकार भ्रमणध्वनीद्वारे डांगुर्णे येथील आपल्या (पान ८ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -73,050 रु.+3% GST
सोने- 24 K -79,800 रु.+3% GST
चांदी- 95,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

भावपूर्ण श्रद्धांजली



स्व.सौ.रमादेवी विनोद अग्रवाल
मृत्यु दि.०९ जानेवारी २०२५

आपल्या पावन स्मृतिस भावपूर्ण श्रद्धांजली!

--------: शोकाकुल :--------

| | |
|---|---|
| केदारनाथ बधान (बापू) | अश्विन बाफना |
| गोकुळ बधान (आबा) | योगेश चौधरी |
| उज्वल बधान | भटुभाऊ भोई |
| पुनम बधान | ॲड.सिसोदे |
| कल्पेश तलवारे | गणेश जाधव |



# हस्ती स्कूलचा राज्य बालनाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत सहभाग

**दोंडाईचा, दि.१८– हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलित हस्ती गृप ऑफ स्कूल दाऊळ शिवार कॅम्पस, दोंडाईचा येथील बालनाट्य गट शालेय समिती चेअरमन कैलास जैन यांचे मार्गदर्शनाने दि.१५ ते १७ जानेवारी दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज नाट्यमंदिर, नंदुरबार २१ व्या महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेत सहभागी झाला होता. सदरची स्पर्धा महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य संचालनालय द्वारा आयोजित करण्यात आली होती.**

बालनाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील बालनाट्य कलाकारांच्या गटाव्दारे नाटक सादर करण्यात आले. यात हस्ती पब्लिक स्कूल अॅण्ड ज्यू.कॉलेज चे बालनाट्य कलाकारांनी राजकन्येचा बंड राजा झाला थंड या विषयावर नाट्य प्रयोग सादर केले. या नाट्य प्रयोगात बाल कलाकार कल्याणी सोनवणे, आर्या सोनार, संस्कृती देवरे, सिद्धी वाघ, वैष्णवी सोनवणे, प्रतीक्षा सपकाळे, नुपूर भोई, अनुष्का नेरकर, तनिष्का नेरकर, गार्गी बेहरे, दुर्वा पवार, समृद्धी सराफ, परिनिता पानपाटील, गायत्री बहिरम, वैभव पाटील, भावेश गिरासे, शुभम नेतकर, साईकृष्ण पाटील,यशपाल गिरासे, साई पाटील, तेजस कोळी, हर्षल पाटील, केवल राजपूत, दक्षक पाटील, हिमांशु शर्मा, आरूष त्रिभुवन, स्पंदन रामोळे आदी सहभागी झाले.

हस्ती वर्ल्ड स्कूलचे बालनाट्य कलाकारांनी छत्रपती शिवाजी महाराज कोणाचे? या विषयावर नाट्य प्रयोग सादर केले. या नाटकात बाल कलावंत शौर्य घरटे, प्रज्ञेश सदाराव, नित्या गोसावी, धनगर स्वरा,आदित्य पाटील, अग्रवाल मोहक, भावसार यज्ञेश, गांगुर्डे दुष्यंत, देशपांडे अर्णव, धनगर जनक, पाटील रोहन, इंदाणी अर्पिता, इंदाणी विराट आदींनी सहभाग नोंदवला.

हस्ती गुरुकुल चे बालनाट्य कलाकारांनी आम्ही नाटक करीत आहोत या विषयावर नाट्य प्रयोग सादर केले. त्यात वैदेही चौधरी, नक्ष बोरसे, सायली पाटील, अनिश पाटील, नितीन अहिरे, वंशिका अहिरराव वरील विद्यार्थ्यांनीही उत्तम अभिनय कला सादर करीत परीक्षकांची व प्रेक्षकांची मने जिंकून स्पर्धेत कौतुकास्पद सहभाग नोंदविला.

बालनाट्य कलाकारांचे व कला शिक्षकांचे शालेय समिती चेअरमन कैलास जैन, प्राचार्य राजेंद्र त्रिभुवन, प्राचार्य जीवन सपकाळे, मुख्याध्यापक सदाशिव महाजन यांनी कौतुक केले. सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रविण गुरव, मनोज ठाकूर, संजय मोरे, राहुल भामरे , रेखा वाघ, सुमित चव्हाण, धनंजय भदाणे, गौतमी गिरासे,ज्योत्सका सोनार, क्रांती, बोरसे, आरती माळी, निलेश धनगर, यांनी परिश्रम घेतले.



# पालेशा वाणिज्य महा.त गांधी विचार संस्कार परीक्षा

**धुळे, दि.१८– धुळे एज्युकेशन सोसायटीचे मा.ध. पालेशा वाणिज्य आणि कला व विज्ञान महाविद्यालय धुळे येथे गांधी रिसर्च फाउंडेशन जळगाव यांच्या मार्फत घेण्यात येणारी गांधी विचार संस्कार परीक्षा मोठ्या उत्साहाच्या वातावरणात पार पडली.**

या परीक्षेला महाविद्यालयातील एकूण ८३ विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. गांधी विचारांचा सफृद्ध वारसा पुढच्या पिढीकडे संक्रमित करण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या गांधी रिसर्च फाउंडेशनच्या माध्यमातून अनेक उपक्रम राबविण्यात येत आहे .एक संवेदनशील व राष्ट्रप्रेमी जागृत व्यक्ती निर्माणाच्या कार्याचा पाया गांधी विचारांवर आधारित असून महाविद्यालयातील तरुण पिढीसाठी २००७ पासून घेण्यात येणाऱ्या गांधी विचार संस्कार परीक्षेला मिळणारा प्रतिसाद उत्साहवर्धक व उपक्रमाचे आवश्यकता अधोरेखित करणारा आहे. व्यक्ती निर्माण द्वारे समाज परिवर्तनासोबत राष्ट्र उभारणीचे हे कार्य असून सोळा वर्षात भारतातील व अन्य देशातील २१ लाखाहून अधिक विद्यार्थ्यांनी शिक्षकांनी या परीक्षेद्वारे गांधी विचार समजून घेण्याचा प्रयत्न केला असून त्याच अनुषंगाने ही परीक्षा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रभाकर महाले यांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय उत्तमरित्या परीक्षा संपन्न झाली. सदर परीक्षेचे समन्वयक म्हणून प्रा.डॉ. हेमंत जोशी व डॉ. कुशल चौधरी यांनी काम बघितले. तसेच सदर परीक्षा घेण्यासाठी डॉ.सुषमा सबनीस यांचे सहकार्य लाभले.



# प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमासाठी पटेल शैक्षणिक संकुलातील दोघांना आमंत्रण

**शिरपूर, दि.१८– आर. सी. पटेल शैक्षणिक संकुलाच्या दोन विद्यार्थ्यांना केंद्रीय रक्षा मंत्रालयातर्फे नवी दिल्ली येथे होणाऱ्या २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमासाठी आमंत्रण देण्यात आले असून ही सर्वांसाठी खूपच अभिमानाची बाब आहे.**

शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचालित आर. सी.पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील ११ वी विज्ञान शाखेचा विद्यार्थी तन्मय अंकुश मराठे व अमरिशभाई आर. पटेल सीबीएसई स्कूल मधील ३ री चा विद्यार्थी लक्ष कुशल हासवानी यांना केंद्रीय रक्षा मंत्रालयातर्फे नवी दिल्ली येथे होणाऱ्या जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमासाठी आमंत्रण प्राप्त झाले आहे.

या कार्यक्रमाला भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, दिग्गज मान्यवर, देशभरातील अनेक मान्यवर या प्रजासत्ताक दिनाच्या ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहतील.

भारत सरकार कडून घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये जे विद्यार्थी प्रथम २५० मध्ये यशस्वी झाले होते, त्या २५० विद्यार्थ्यांना या ठिकाणी विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहण्याची बहुमानाची संधी मंत्रालयाकडून संधी प्राप्त झाली आहे. संशोधनाच्या क्षेत्रात सुद्धा अनेक वेळा राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेमध्ये तन्मय अंकुश मराठे याची निवड झाली होती. ज्या पैकी निती आयोगाची प्रमुख स्पर्धा, ३१ वी राष्ट्रीय बाल विज्ञान परिषद, अटल मॅरेथॉन, यंग सायंटिस्ट इंडिया, इस्रो कडून राबविली जाणारी स्पेस इंडिया स्पर्धा, इत्यादी स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावरील पातळी तन्मय मराठे याने गाठली आहे. या सर्व निकषांवर त्याला प्रजासत्ताक दिनासाठी आमंत्रण प्राप्त झाले आहे.

तसेच संरक्षण मंत्रालय व शिक्षण मंत्रालयाने सुरू केलेल्या वीर गाथा ४.० या प्रतिष्ठित प्रकल्पासाठी अमरिशभाई आर. पटेल सीबीएसई स्कूलचा ३ री चा विद्यार्थी लक्ष कुशल हसवानी याची राष्ट्रीय स्तरावर निवड झाली आहे. या स्पर्धेसाठी संपूर्ण भारतातील त्यातून एकूण १०० विद्यार्थ्यांची निवड केली जाते. त्यात संपूर्ण महाराष्ट्रातील एकूण २० विद्यार्थ्यांची निवड झाली आहे व धुळे जिल्ह्यात २ विद्यार्थ्यांची निवड झाली असून त्यातील १ विद्यार्थी म्हणजे लक्ष कुशल हासवानी हा विद्यार्थी आहे.

या दोन्ही विद्यार्थ्यांचे दिल्ली येथे पारितोषिक देऊन संरक्षण मंत्रालय आणि शिक्षण मंत्रालयाने द्वारे गौरव करण्यात येणार आहे.

यावेळी या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उद्योगपती चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव सौ.रेषा पटेल, सीईओ डॉ. उमेश शर्मा, अॅकॅडमिक इन्चार्ज पी. व्ही. पाटील, प्राचार्य पी.आर. साळुंखे, प्राचार्य के. राव, शिक्षिका उषा मनोरे यांनी कौतुक केले असून संस्थेच्या वतीने दोन्हीही विद्यार्थ्यांचा पालकांसह सत्कार करण्यात आला.

## स्वतंत्र भारत पक्षाचे लाक्षणिक उपोषण

धुळे, दि.१८– पंजाब मधील शेतकरी आंदोलनाला केंद्र सरकार देत असलेल्या वागणुकीचा निषेध करण्यासाठी व सरदार डल्लेवावल यांनी उपोषण सोडावे याकरीता उद्या दि.२० जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर स्वतंत्र भारत पक्षाच्या वतीने एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात येणार आहे.

या आंदोलनात सर्व शेतकरी संघटना, शेतकरी हितेशी चळवळींनी भाग घ्यावा. सरकारच्या दडपशाहीला पायबंद घालायचा असेल तर सर्व शेतकरी संघटनांनी, शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन अनिल घनवट, मधुसूदन हरणे, सीमा नरोडे, गुलाबसिंग रघुवंशी, पुरूषोत्तम देवरे यांनी केले आहे.

* धुळे, दि.१८– देवपूर नकाणे रोडवर ड्रेनेजलाईनचे काम अर्धवट सोडून दिल्याने मुख्य रस्त्यावर खड्डेच खड्डे झाले आहेत. वाहनधारकांकडून खड्डे चुकवितांना अपघात होण्याची शक्यता असल्याने खड्डे तत्काळ बुजण्यात यावे अशी मागणी होत आहे.

# शिक्षणशास्त्र महा.स नॅकची बी श्रेणी प्राप्त



**शहादा,दि.१८(का.प्र.)– येथील पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळ संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालयास नॅक मूल्यांकन समितीकडून २.३७ सीजीपीएसह बी श्रेणी प्राप्त झाली असून मंडळाचे अध्यक्ष दीपकभाई पाटील व संचालक मंडळाकडून महाविद्यालयाचे अभिनंदन करण्यात आले आहे.**

याबाबत अधिक माहिती अशी, येथील पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळ संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालयास दि.८ व ९ जानेवारी २०२५ रोजी त्रिसदस्यीय नॅक समितीने भेट दिली होती. समितीत अध्यक्ष डॉ. तिरुमलाई कुमार एस. (चेन्नई) यांच्या सह डॉ. बाना बिहारी मिश्रा (ओरिसा), डॉ. दिपा जैन (इन्दोर) यांचा समावेश होता. नॅक समितीने महाविद्यालयाच्या विविध विभागांसह प्रशासकिय कार्यालय, ग्रंथालय, संगणक विभाग, विज्ञान प्रयोगशाळा अंतर्गत गुणवत्ता विभाग, अध्ययन अध्यापन विस्तार विभाग, जिमखाना, वसतिगृह, उपहारगृह, परीक्षा विभाग, सांस्कृतिक विभाग, सरावपाठ शाळा आदिंना भेट देऊन तपासणी केली. पालक संघ, माजी विद्यार्थी संघ, महाविद्यालयातील विद्यमान विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्याशी संवाद साधून माहिती जाणून घेतली. समितीने व्यवस्थापन समितीतील मंडळाचे उपाध्यक्ष जगदीश पाटील, संचालक रमाकांत पाटील, समन्वयक प्रा. मकरंद पाटील आदिंशी हितगुज साधले. महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. किर्ती महाडिक यांनी नॅकने सूचीत केलेल्या विविध निकषांच्या आधारे माहितीचे सादरीकरण केले. नॅक मूल्यांकन समिती समन्वयक म्हणून प्रा.अमर पाटील यांनी काम पाहिले. नॅक समितीने विविध निकषांनुसार तपासणी करुन महाविद्यालयास २.३७ सीजीपीएसह बी श्रेणी दिली असून तशा आशयाचे पत्र महाविद्यालयास प्राप्त झाले आहे. नॅक समिती तपासणी दरम्यान मंडळाचे समन्वयक प्रा. मकरंद पाटील, संचालक मयुरभाई पाटील, विविध विद्याशाखांचे प्राचार्य व कर्मचारी यांनी मार्गदर्शन व सहकार्य केले. महाविद्यालयास प्राप्त झालेल्या बी श्रेणीबाबत मंडळाचे अध्यक्ष दीपकभाई पाटील, उपाध्यक्ष जगदीश पाटील, सचिव श्रीमती कमलताई पाटील, समन्वयक प्रा. मकरंद पाटील, संचालक मयूरभाई पाटील आदिंनी अभिनंदन केले आहे.



# तोरखेडा–शिर्डी पालखी सोहळा उत्साहात

**शहादा, दि.१८ (प्रतिनिधी)– तालुक्यातील तोरखेडा येथून सालाबादप्रमाणे आज शुक्रवार दि.१७ जानेवारी रोजी तोरखेडा ते शिर्डी भव्य पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.**

तोरखेडा येथून ४५ साई भक्त पालखी सह शिर्डीकडे रवाना झाली. या पाई पालखी सोहळ्याचे हे १६ वे वर्ष असून साई नामाच्या गजराने तोरखेडा नगरी दुमदुमून गेली होती. या पालखी सोहळ्याचे आयोजन साई बाबा पालखी सोहळ्याचे अध्यक्ष दिनेश शामराव वाडीले सह साई भक्त दिनेश मोरे, मनोज मराठे, रविंद्र मोरे, समाधान धनगर, आकाश मोरे, सागर गोसावी, योगेश मराठे, नागेश रामोळे, योगेश पाटील आदिंनी केले. पालखी सोहळ्या निमीत्ताने संजय बागले यांनी भंडाऱ्याचे आयोजन केले. या पालखी सोहळ्यात माजी पंचायत समिती सदस्य प्रियदर्शन कदमबांडे, सरपंच प्रतिनीधी मनिष गरूड, ग्रामपंचायत सदस्य किशोर घोरपडे, रविंद्र रामोळे, उपसरपंच परशुराम रामोळे, मोतिलाल चौधरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# विद्यार्थ्यांच्या रंगोत्सव कला महोत्सवात पटेल सैनिकी विद्यालयाने मिळवले यश

**शिरपूर, दि.१८– श्री विलेपार्ले केळवाणी मंडळ मुंबई संचलित तांडे येथील मुकेशभाई आर. पटेल सैनिकी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी चित्रकला स्पर्धेत राष्ट्रीय पातळीवर यश संपादन केले आहे.**

रंगोत्सव महोत्सव मुंबई यांच्याद्वारे राष्ट्रीय पातळीवर चित्रकला स्पर्धा तसेच विविध प्रकारचे कलेचे प्रकार यासाठी राष्ट्रीय पातळीवर स्पर्धा आयोजित केली. या स्पर्धेत सैनिकी प्राचार्य दिनेशकुमार राणा यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यामध्ये एकूण विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ते आंतरराष्ट्रीय कला स्पर्धेसाठी पात्र झाले आहेत. या स्पर्धेत कलरिंग, हॅन्ड रायटिंग, कोलाज मेकिंग, चित्र रेखाटन, टॅटू आर्ट, हाताची बोट तसेच अंगठ्याच्या साह्याने कलाकृती निर्माण करणे असे विविध कला प्रकारांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट प्रदर्शन करून विविध पारितोषिक प्राप्त केली. विद्यार्थ्यांना सुवर्ण, रजत, कास्य, गिफ्ट तसेच एकूण चषक प्राप्त झाले. चषक तसेच गुणपत्रक देऊन सन्मानित झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये जयवीर जाधव, मयंक चौधरी, जूगीराम पावरा, धनश्री शिवदे या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. त्यांना कलाशिक्षक चंद्रसिंग पावरा यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या यशाबद्दल एस.व्ही.के.एम. संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरीशभाई पटेल, सहअध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी, शालेय डायरेक्टर गिरिजा मोहन, इतर मान्यवर, प्राचार्य दिनेशकुमार राणा, सर्व शिक्षक, कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# विद्यार्थ्यांनी ज्ञानाचा उपयोग समाजातील सर्व घटकांसाठी करावा: चंद्रजित पाटील




**साक्री, दि.१८(प्रतिनिधी)– आदिवासी समुदायातील शिक्षित विद्यार्थ्यांनी आपल्याला अवगत झालेल्या ज्ञानाचा उपयोग समाजातील सर्व घटकांसाठी करावा. राज्य शासन तसेच केंद्र शासनाने सुरू केलेल्या विविध विकास योजनांची माहिती समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करावेत. असे मत विद्या विकास मंडळाचे उपाध्यक्ष चंद्रजीत सुरेश पाटील यांनी व्यक्त केले.**

विद्या विकास मंडळाचे सिताराम गोविंद पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्री येथे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियाना अंतर्गत आयोजित ट्रायबल कम्युनिटी डेव्हलपमेंट प्रोग्राम कार्यशाळेच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते. सदर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ.पी.एस. सोनवणे उपस्थित होते. प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे, कार्यशाळेचे वक्ते डॉ. मोहन पावरा, डॉ. खुमानसिंग वळवी, उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील उपस्थित होते.

चंद्रजीत सुरेश पाटील बोलताना पुढे म्हणाले की, लोकनेते दादासाहेब रामराव सिताराम पाटील यांनी विद्या विकास मंडळ या संस्थेची स्थापना तालुक्यातील आदिवासी, वंचित, बहुजन समुदायातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी प्राप्त व्हावी यासाठी केली. तोच आदर्श घेऊन विद्या विकास मंडळाचे सचिव सुरेश रामराव पाटील व अध्यक्षा मंगलाताई सुरेश पाटील कार्य करत आहेत. आदिवासी समुदायातील उदासीनतेमुळे विकास योजनेची अंमलबजावणी करताना अडचणींना सामोरे जावे लागते. या समुदायातील विद्यार्थ्यांनी जागरूक होऊन समाजाच्या विकासासाठी प्रयत्नरत व्हावे असे देखील मत त्यांनी प्रसंगी व्यक्त केले. प्राचार्य डॉ. पी.एस. सोनवणे यांनी देखील प्रसंगी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे यांनी व्यक्त केले. सदर कार्यशाळेत डॉ. मोहन पावरा यांनी सामाजिक साक्षरता, डॉ. खुमानसिंग वळवी यांनी पेसा कायद्यातून ग्रामविकास, विजय हिरे यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन आणि अनिष्ट रूढी परंपरा तसेच प्रवीण खरे यांनी रोजगाराच्या संधी व व्यक्तिमत्व विकास या विषयावर मार्गदर्शन केले.

सदर कार्यशाळेचा समारोप प्राचार्य डॉ. लहू पवार यांच्या हस्ते करण्यात आला. आदीम काळापासून आदिवासी समाज जल, जंगल आणि जमिनीला सुरक्षित करून पर्यावरण पूरक जीवन जगत आहे असे मत त्यांनी समारोपा प्रसंगी व्यक्त केले. समारोप समारंभाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील उपस्थित होते. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे यांनी सदर कार्यशाळेमुळे आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास जागरूक होऊन सामाजिक भान निर्माण होईल असा आशावाद व्यक्त केला. समारोप कार्यक्रमाचे संचालन प्रदीप राठोड यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संयोजन समितीतील प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी बांधव यांनी परिश्रम घेतले. सदर कार्यशाळेत १०० आदिवासी विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

## विष प्राशन केले दोघांचा मृत्यू

धुळे, दि.१८– शिरपूर तालुक्यातील खैरखुटी गावातील सोळा वर्षीय अल्पवयीन मुलीने तसेच धुळे तालुक्यातील काळखेडा गावातील त्रेसष्ट वर्षीय ज्येष्ठ नागरिकाने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या आहेत.

नातेवाईकांनी दिलेल्या खबरीनुसार, खैरखुटी येथील सोळा वर्षीय अल्पवयीन मुलीने शेतात दि.१२ जानेवारी रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास काही तरी विषारी औषध प्राशन केले. तोंडाला फेस येत असल्याने शिरपूर येथील कॉटेज हॉस्पिटल येथे दाखल केले असता तेथील डॉक्टरांनी तपासून मयत घोषित केले. या प्रकरणी शिरपूर तालुका पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

दुसऱ्या घटनेत धुळे तालुक्यातील काळखेडा गावातील दिलीप हरी सोनवणे (वय ६३) हे कपाशी पिकावरील फवारणीचे औषध पिल्याने अत्यवस्थ स्थितीत आढळून आले. त्यांना सिव्हील हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मयत घोषित केले. धुळे तालुका पोलीस स्टेशनला याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# राष्ट्रध्वजाच्या सन्मानासाठी प्लास्टिक ध्वज टाळा जिल्हाधिकारी डॉ.मित्ताली सेठी यांचे आवाहन

**नंदुरबार, दि.१८– जिल्हा प्रशासनाने प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर सर्व नागरिकांना राष्ट्रध्वजाचा योग्य तो सन्मान राखण्याचे आवाहन केले आहे. २६ जानेवारी, १ मे महाराष्ट्र दिन, आणि १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन यासारख्या राष्ट्रीय सणांच्या वेळी राष्ट्रध्वजाचा मान राखणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी सांगितले आहे.**

जिल्ह्यातील शासकीय, निमशासकीय, सामाजिक अशासकीय संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, शाळा, महाविद्यालये, तसेच पोलीस यंत्रणांना राष्ट्रध्वजाच्या वापराबाबत सतर्क राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामध्ये विशेषतः प्लास्टिक ध्वजांचा वापर पूर्णपणे टाळण्यावर भर देण्यात आला आहे. नागरिकांनी वैयक्तिक वापरासाठी केवळ कागदी ध्वजाचा वापर करावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या निर्देशानुसार प्लास्टिक ध्वजांचा वापर करता येणार नाही. अशा प्रकारचे ध्वज पर्यावरणासाठी घातक असून, त्याचा योग्य प्रकारे नाशही होऊ शकत नाही. यामुळे प्लास्टिक ध्वज विक्रीस बंदी घालण्यात आली आहे, तसेच अशा ध्वजांचा वापर करणाऱ्या व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

राष्ट्रीय समारंभांनंतर राष्ट्रध्वजाचा योग्य सन्मान राखला जावा. राष्ट्रध्वज फाटलेला असल्यास तो भारतीय ध्वज संहितेनुसार सन्मानपूर्वक नष्ट करणे आवश्यक आहे. राष्ट्रध्वजाचा अवमान होणार नाही याची काळजी प्रत्येकाने घ्यावी. तसेच, राष्ट्रध्वजाचा अवमान करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न आढळल्यास संबंधित व्यक्तींवर राष्ट्रीय अवमान प्रतिबंध कायदा १९७१ कलम २ अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येईल, असेही जिल्हाधिकारी डॉ. सेठी यांनी कळविले आहे.

जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, शाळा–महाविद्यालये, आणि सामाजिक संघटनांना प्लास्टिक ध्वजाचा वापर टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जिल्हा प्रशासनाच्या या सूचनेचे पालन करत राष्ट्रध्वजाचा सन्मान राखणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

राष्ट्रध्वज ही आपल्या देशाची शान आहे, त्याचा मान राखूनच आपण राष्ट्रीय सण साजरे करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी केले आहे.

## गळफास घेवून तरूणीचा मृत्यू

धुळे, दि.१८– साक्री तालुक्यातील ब्राम्हणवेल गावातील अठरा वर्षीय तरूणीने राहत्या घरात लोखंडी पाईपला दोरीने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे.

नातेवाईकांनी दिलेल्या खबरीनुसार, ब्राम्हणवेल येथील अठरा वर्षीय तरूणी पत्रटी राहत्या घराच्या लोखंडी पाईपला दोरीने गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आली. परिसरातील नागरिक व पोलीसांच्या मदतीने खाली उतरवून जैताणे ग्रामीण रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मयत घोषित केले.

# गो–संजीवन फार्म म्हणजे सेंद्रिय शेतीचे परीपुर्ण मॉडेल: जिल्हाधिकारी पापळकर

**धुळे, दि.१८– धुळे तालुक्यातील वडने येथील गो–संजीवन संस्था व सेंद्रिय शेती प्रशिक्षण केंद्राचे प्रवर्तक कृषी भूषण दिलीप पाटील यांनी आपल्या शेतावर सेंद्रिय शेतीचे परिपूर्ण लाईव्ह मॉडेल उभे केले आहे. सेंद्रिय शेतीच्या दहा खांबासह प्रक्षेत्रावर परिपूर्ण बायोडायव्हर्सिटी निर्माण केली आहे ही बाब निश्चितच कौतुकास्पद असल्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर सांगितले. जिल्हाधिकाऱ्यांनी वडने येथे भेट देवून कृषी भूषण दिलीप पाटील यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली.**

गो–संजीवन फार्मच्या शेत बांधावरील वन भिंत, सिताफळ लागवड, तूर, गहू, ज्वारी, हरभरा, भाजीपाला ,सापळा पिके ,आंतरपिके, मिश्र पिके शेतावरच तयार केलेल्या पीक पोषण व पिक संरक्षण साठीच्या बाबी पाहून जिल्हाधिकारी यांनी समाधान व्यक्त केले. सातत्य ठेवून प्रमाणित सेंद्रिय शेती केल्या मुळे माझ्या शेतीचा ऑरगॅनिक कार्बन वाढलेला असून जमीन उपजावू झाली आहे. माझ्या उत्पन्नात देखील वाढ झाली आहे. असे दिलीप पाटील यांनी सांगितले. सेंद्रिय शेतीचे इतके फायदे असताना देखील शेतकरी पुढे का येत नाहीत ? अशी खंत जिल्हाधिकारी यांनी यावेळी व्यक्त केली. त्यावर दिलीप पाटील यांनी सांगितले की, सेंद्रिय शेती ही कष्टाची व नियोजनाचे आहे .सेंद्रिय शेतीच्या निविष्ठा या स्वतःच्या शेतात तयार करावयाच्या असल्याने यासाठी शेतकरी सहसा यासाठी तयार होत नाही. मात्र पीक पोषण असो व पीक संरक्षण यापैकी काही निविष्ठा स्वतः तयार करून वापरतात. पण त्याचा एवढा परिणाम दिसून येत नाही म्हणून शेतकरी त्यांचा प्रयत्न मधेच सोडून देतात असेही पाटील यांनी यावेळी सांगितले . ङ्ग या दौऱ्याच्या वेळी जिल्हा अध्यक्ष कृषी अधिकारी सुरज जगताप, प्रकल्प संचालक हितेंद्र सोनवणे, प्रकल्प अधिकारी स्मार्ट प्रकल्प विनय बोरसे, उपविभागीय कृषी अधिकारी बापू गावित, कृषि विज्ञान केंद्राचे समन्वयक डॉ. नांद्रे व त्यांचे सहकारी, तालुका कृषी अधिकारी वाल्मीक प्रकाश, मंडळ कृषी अधिकारी भालेराव बोरसे, कृषी पर्यवेक्षक प्रवीण पवार, संजय देवरे, कृषी सहाय्यक यांचेसह पंचक्रोशीतील प्रगतीशील शेतकरी दरबार गिरासे, भटू गिरासे, प्रकाश किसन पाटील, प्रमोद जैन, राजेंद्र पाटील, पुंडलिक पाटील, हटेशिंग गिरासे, ग्रामसेवक प्रवीण बोरसे, तेजस पाटील, ज्ञानेश्वर पाटील आदी शेतकरी उपस्थित होते.

# हस्ती स्कूलच्या विद्यार्थ्यांनी मिळवले एलिमेंट्री व इंटरमिजीएट परीक्षेत यश



**दोंडाईचा, दि.१८– हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलित, हस्ती पब्लिक स्कूल अँड ज्यू. कॉलेज व हस्ती वर्ल्ड स्कूल आणि हस्ती गुरूकुल दाऊळ शिवार कॅम्पस दोंडाईचा येथील विद्यार्थी माहे सप्टेंबर २०२४ मध्ये संपन्न झालेल्या शासकीय रेखाकला एलिमेंट्ररी व इंटरमिजिएट म परीक्षेस प्रविष्ट झाले होते. सदर परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, त्यात हस्तीच्या तब्बल १४५ विद्यार्थांनी घवघवीत यश संपादन केले.**

यावर्षी इंटरमिजिएट परीक्षेस प्रविष्ट १०४ विद्यार्थ्यांपैकी अक्षरा पटेल, हेमाक्षी पाटील, कशिश महाले, साक्षी पाटील या विद्यार्थ्यांनी ब श्रेणी प्राप्त केली. तर शंभर विद्यार्थी क श्रेणीत उत्तीर्ण झाले.

सोबतच एलिमेंट्री परीक्षेस प्रविष्ट ७४ विद्यार्थ्यांपैकी जिग्नेश दुर्गेश पवार या विद्यार्थ्यांने अ श्रेणी मिळविली. तर अनघा पाटील, फातेमा दाउदि, हर्षदा पवार, सारिका गिरासे, यशवर्धन पाटील या विद्यार्थ्यांनी ब श्रेणी प्राप्त केली.तर ६८ विद्यार्थी क श्रेणीत उत्तीर्ण झाले.

वरील सर्व यशस्वितांचे हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट अध्यक्ष अशोक जैन, कार्याध्यक्ष किशोर जैन, हस्ती शालेय समिती चेअरमन कैलास जैन, तसेच प्राचार्य राजेंद्र त्रिभुवन, प्राचार्य जीवन सपकाळे, मुख्याध्यापक सदाशिव महाजन यांनी कौतुक व अभिनंदन केले. तर हस्ती स्कूल कला शिक्षक राहुल भामरे, कला शिक्षिका आरती माळी, प्रियंका मिस्तरी यांचे मार्गदर्शन लाभले.

## पान १ वरुन

### बलात्कार-खून प्रकरणात रॉय दोषी

ट्रेनी डॉक्टर म्हणून काम करणारी एक महिला डॉक्टर ८ ऑगस्टच्या रात्री उशिरा शिफ्ट संपल्यानंतर आराम करण्यासाठी सेमिनार हॉलमध्ये गेली होती. ९ ऑगस्टला सकाळी तिचा मृतदेह सेमिनार हॉलमध्ये आढळून आला. मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले तेव्हा कळले की, तिच्यावर बलात्कार करुन तिची हत्या करण्यात आली. तिच्या शरीरावर २५ जखमा होत्या. संजय रॉयनेच या डॉक्टरवर आधी बलात्कार केला आणि त्यानंतर अत्यंत क्रूरपणे तिची हत्या केली. तसेच मृतदेहाची विटंबना केली. सीसीटीव्ही फुटेजमध्ये संजय रॉय सेमिनार हॉलमध्ये गेला होता आणि नंतर पहाटे ४.३० च्या सुमारास बाहेर आला हे दिसले होते.

### हॉल तिकिटावर जातीचा उल्लेख

शाळेत विद्यार्थ्यांच्या जातीचा उल्लेख काय झाला आहे, त्यांच्या जातीचा प्रवर्ग कोणता आहे, याची माहिती विद्यार्थी आणि पालकांना मिळावी यासाठी दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांच्या हॉल तिकिटावर जात प्रवर्गाचा उल्लेख करण्यात आल्याचे शिक्षण विभागाकडून स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

### धुळ्याचे पालकत्व रावलांकडे

अजित पवार, नागपूर - चंद्रशेखर बावनकुळे, अमरावती चंद्रशेखर बावनकुळे, अहमदनगर - राधाकृष्ण विखे पाटील, वाशिम - हसन मुश्रीफ, सांगली - चंद्रकांत पाटील, नाशिक - गिरीश महाजन, पालघर - गणेश नाईक, जळगाव -गुलाबराव पाटील, यवतमाळ - संजय राठोड, मुंबई उपनगर - आशिष शेलार तर सहपालकमंत्री - मंगलप्रभात लोढा, रत्नागिरी - उदय सामंत, धुळे - जयकुमार रावल, जालना - पंकजा मुंडे, नांदेड - अतुल सावे, चंद्रपूर - अशोक उईके, सातारा - शंभूराज देसाई, रायगड - आदिती तटकरे, लातूर - शिवेंद्रराजे भोसले, नंदूरबार - माणिकराव कोकाटे, सोलापूर - जयकुमार गोरे, हिंगोली - नरहरी झिरवाळ, भंडारा - संजय सावकारे, छत्रपती संभाजीनगर - संजय शिरसाट, धाराशिव - प्रताप सरनाईक, बुलढाणा - मकरंद जाधव, सिंधुदुर्ग - नितेश राणे, अकोला - आकाश फुंडकर, गोंदिया -बाबासाहेब पाटील, कोल्हापूर - प्रकाश आबिटकर तर सह पालकमंत्री - माधुरी मिसाळ, वर्धा - पंकज भोयर, परभणी - मेघना बोर्डीकर.

### शहादा रस्त्यावर काटेरी झुडुपे वाढली

जाऊ लागली तेही कळत नाही. अनेक वेळेस अपघातही झालेले आहेत. त-हाडी ते तोरखेडा फाटापर्यंतच्या रस्त्याच्या दुतर्फा बाजुने काटेरी झाडे मोठ्या प्रमाणात वाढल्याने दुचाकी वाहन व चार चाकी वाहनांना मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. काटेरी झाडे काढण्याची मागणी वाहन चालकातून होत आहे. या रस्त्यावर जागोजागी मोठमोठे खड्डे पडले आहेत. रात्रीला धोकादायक आहेत. संबंधित रोड व पुलाचे काम करणाऱ्या गुत्तेदारावर प्रशासन मेहेरबान असल्याने हे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले आहे. सदरील कामाची पहाणी वरीष्ठ अधिकाऱ्यांकडून झाली पाहिजे अशी मागणी जनतेतून होत आहे. मुळात या रस्त्याचे खड्डेच निकृष्ट दर्जाचे काम केली आहे.

### मंगल कार्यालय व्यावसायिकाची..

वाचमन व गुंडांनी शिवीगाळ करत मारहाण केली. याबाबत देवपूर पश्चिम पोलीस स्टेशनला फिर्याद नोंदविण्यात आली आहे. जबर मारहाण केल्याने प्रकाश पाटील हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर खाजगी रूग्णालयात अतिदक्षता विभागात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. व्यावसायिकाची अरेरावी सुरू झाली आहे. कॉलनी परिसरातील नागरिकांवर केव्हाही हल्ला होवू शकतो. कॉलनी परिसरातील नागरिकांना न्याय द्यावा. अशी मागणी दि.विजय पोलीस कर्मचारी सह.गृहनिर्माण हौसिंग सोसायटी लि.मधील रहिवासी सुशिला पाटील, वैशाली वाघ, के.जी.कदम, आर.आर.सिसोदिया, एल.डी.भदाणे, व्ही.के.मेहरूणकर, शो.अ.दुसाने, पी.आर.पाटील, भारती पाटील, निर्मला बोरसे, शालिनी सराफ, वंदना जोशी, माया काळे, सुमन महाजन, एस.एस.पाटील, ए.ए.राजपुत यांच्यासह अनेक रहिवाशांनी केली आहे.

### श्री शाकंभरी मातेच्या यात्रोत्सवास प्रचंड प्रतिसाद

शाकंभरी देवी आहे. प्राचीन काळी या भागात खूप मोठा दुष्काळ पडला होता. तो बरीच वर्षे टिकून होता. त्या दुष्काळामुळे भुकेने, तहानलेले सर्व प्राणी व्याकूळ झाले होते. या सर्व प्राणिमात्रांचे प्राण वाचावे, पालनपोषण करण्यासाठी देवी भगवतीला दया आली. या सर्व प्राणीमात्रांचे प्राण वाचवण्यासाठी तिने जे रूप घेतले तेच म्हणजे अष्टभुजा शाकंभरी देवी होय. शाकंभरी याचा अर्थ शाक भाजी, म्हणजेच कंदमुळे, भाजी या देवीच्या कृपेने येथे उत्पन्न झाली. त्यामुळे लोकांची भूक तहान भागली. सर्व प्राणिमात्रांवर दया दाखवणारी अशी देवी म्हणजेच अष्टभुजा शाकंभरी देवी होय. देवीच्या कृपेने या क्षेत्रात सुख, संपन्नता आली. ते सहन न झाल्यामुळे दैत्यांनी येथील लोकांना त्रास देणे सुरू केले. त्या दैत्यांचा, राक्षसांचा वध करण्यासाठी साक्षात भवानी देवी सिंहावर आरूढ होऊन दैत्य राक्षसांचा नाश केला. ती देवी म्हणजेच अष्टभुजा शाकंभरी देवी होय. या देवीला धनधान्य समृद्धीची देवी असेही म्हणतात. स्कंदपुराणात देवी भागवतात असा उल्लेख आहे. पौष महिन्याच्या शुद्ध पक्षात येथे अष्टमी ते पौर्णिमा अशी शाकंभरी नवरात्र साजरी होत असते. राजस्थान, कर्नाटक, उत्तरांचल अशा ठिकाणी शाकंभरी देवीचे मंदिर आढळून येतात. श्री अष्टभुजा शाकंभरी देवीचे महाराष्ट्रातील प्रसिद्ध मंदिर मंदाणे (ता. शहादा) येथे आहे. मंदिराचा जीर्णोद्धार ग्रामस्थांनी करून भव्य मंदिर उभे केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या यात्रा विकास योजनेत मंदाणे या गावाची निवड झालेली आहे. या यात्रेत महाराष्ट्रासह परराज्यातले भाविक ही दर्शनाला येत असतात. अनेक भाविक आपल्या लहान बालकांचे जाऊळ या ठिकाणी काढत असतात. नवस फेडण्यासाठी येतात. नवसाला पावणारी देवी म्हणून या देवीकडे पाहिले जाते. ग्रामस्थांतर्फे भंडारा दिला जातो. जीवनोपयोगी साहित्य, कृषी साहित्य यासाठी ही यात्रा प्रसिद्ध आहे. मंदाणे गाव देखील महाराष्ट्र मध्यप्रदेश सिमेजवळ महाराष्ट्रात आहे. साधारण अठरा हजार पेक्षा जास्त लोकसंख्येचे मोठे गाव आहे. या गावात वामन बुवा महाराज यांनी श्रीराम मंदिराची स्थापना करून दर गुरुवारी येथे आठवडे बाजाराला सुरुवात केली. वटेश्वर महादेव मंदिर देखील या गावात प्रसिद्ध आहे. एकाच मंदिरात पाच मूर्ती आढळतात. शिवाजी महाराजांनी येथील अष्टभुजा शाकंभरी देवीचे दर्शन घेतल्याची आख्यायिका आहे.

कुलदैवत शाकंभरी अष्टभुजा देवीच्या यात्रेत महाराष्ट्रसह राजस्थान, मध्य प्रदेश, गुजरात, बिहार, उत्तर प्रदेश आदी राज्यातून सर्व धर्मीय व्यावसायिक व यात्रेकरू दाखल झाले आहेत. त्यांना सुविधा पुरवण्यासाठी सरपंच सुशीलाबाई पंडीत पवार व सामाजिक कार्यकर्ते पंडीत पवार, उपसरपंच शरदभाऊ साळुंखे, ग्रामविकास अधिकारी दिनेश पाटील परिश्रम घेत असून भाविकांचे तसेच व्यावसायिकांचे आरोग्याची समस्या उदभवू नये म्हणून मंदाणे प्राथमिक आरोग्य केंद्राकडून आरोग्य बुथ उभरण्यात आला आहे. आरोग्य सेवा देण्याची जबाबदारी वैद्यकीय अधिकारी डॉ.जितेंद्र पाटील व कर्मचारी सांभाळत आहेत. तसेच कायदा व सुव्यवस्था टिकून राहावी यासाठी पोलीस निरीक्षक निलेश देसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार अशोक कोळी व कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

### चालक-विद्यार्थ्यांमध्ये वादविवाद

नातेवाईकांना कळवला. यावरून नातेवाईकांनी सदर बस डांगुर्णे येथे आली असता बस थांबून वाहक व चालक यांच्याकडे झाल्या प्रकाराबाबत जाब विचारला. यावेळी बस दोन तास डांगुर्णे येथे थांबून होती. सदर प्रकार शिंदखेडा पोलिसांना समजल्यावरून पोलीस तसेच राज्य परिवहन महामंडळाचे अधिकारीही घटनास्थळी दाखल झाले. वाहक दोन्ही बाजूकडे समजावण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, बस मधील प्रवासी दुसऱ्या बसमध्ये बसून सदर बस चिमठाणा पोलीस आउट पोस्ट येथे थांबवण्यात आली. संध्याकाळी उशिरापर्यंत या प्रकरणी कोणीही तक्रार दाखल केली नसल्याचे समजते. सदर प्रकार डांगुर्णे येथे चर्चेचा विषय बनला होता.

## शेतात गळफास घेवून एकाची आत्महत्या

धुळे, दि.१८- साक्री तालुक्यातील घोडदे चिखलीपाडा गावातील चाळीस वर्षीय इसमाने शेतातील झाडाला दोरीने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे.नातेवाईकांनी दिलेल्या खबरीनुसार, घोडदे चिखलीपाडा येथील संजय रूपला जाधव (वय ४०) हे दि.१४ जानेवारी रोजी सकाळी सहा वाजेच्या सुमारास प्रकाश घरटे यांच्या शेतातील पेरूच्या झाडाला दोरीने गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आले. पोलीस पाटील व इतर नागरिकांच्या मदतीने खाली उतरवून साक्री ग्रामीण रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता डॉ.रिना साहु यांनी तपासून मयत घोषित केले.

## आर.सी.पटेलच्या पूजा जैन यांची बीसीसीआय क्रिकेट प्रशिक्षकपदी वर्णी

**शिरपूर, दि.१८- आर.सी.पटेल शिरपूरच्या क्रीडा संचालिका पूजा जैन यांची बीसीसीआय क्रिकेट प्रशिक्षक पदी वर्णी लागली असून सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.**

येथील आर.सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचलित इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंटच्या क्रीडा संचालिका पूजा भोगीलाल जैन यांनी इतिहास घडवला आहे. दरवर्षी भारतातील केवळ २५ जणांची बीसीसीआय क्रिकेट प्रशिक्षक लेवल-१ साठी निवड केली जाते. पूजा भोगीलाल जैन यांनी बीसीसीआय क्रिकेट प्रशिक्षक लेवल-१ कोर्समध्ये डिस्टिंक्शन मिळवत यशस्वीरीत्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन घवघवीत यश संपादन केले. यावर्षी बीसीसीआय क्रिकेट प्रशिक्षक लेवल -२ साठी पात्र ठरलेल्या ३ प्रशिक्षकांपैकी पूजा जैन या एकमेव महिला प्रशिक्षक ठरल्या आहेत.



बीसीसीआय क्रिकेट प्रशिक्षक लेवल-१ कोर्ससाठी निवड झाल्यानंतर पूजा जैन यांना प्रसिद्ध क्रिकेटपटू व्ही.व्ही.एस. लक्ष्मण, हार्दिक पांड्या, अर्शदीप सिंग, कुलदीप यादव, ऋषिकेश कानडे यांच्याकडून मार्गदर्शन मिळाले. या कोर्समध्ये त्यांनी मिळवलेले ज्ञान व कौशल्य त्यांच्या वैयक्तिक व व्यावसायिक प्रगतीसाठी मोलाचे ठरेल. पूजा जैन यांना भविष्यात राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय महिला क्रिकेट संघासाठी प्रशिक्षक म्हणून काम करण्याची संधी त्यांना मिळणार आहे. आपल्या यशाचे श्रेय पूजा जैन यांनी आपले आई-वडील तसेच माजी शिक्षणमंत्री आमदार अमरिशभाई पटेल, धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष भूपेशभाई पटेल, आय.एम.आर. डी. परिसंस्थेचे आभार मानत सांगितले की, मी माझ्या देशाचे नाव उंचावण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करत राहीन.त्यांचा या ऐतिहासिक यशाबद्दल माजी शिक्षणमंत्री आमदार अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीबेन पटेल, धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष भूपेशभाई पटेल, धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सल्लागार राजवर्धन कदमबांडे, आर. सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्टचे उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, संस्था सचिव राजगोपाल भंडारी, सीईओ डॉ.उमेश शर्मा, क्रिकेट असोसिएशन सचिव प्रितेश पटेल, हेड कोच राजन चौक, डॉ.वैशाली पाटील, प्रा.मनोज बेहेरे, डॉ.मनोज पटेल, डॉ.तुषार पटेल, शिक्षक व कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## जिल्हा परिषद निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी सज्ज व्हावे!

### शिवसेना संपर्कप्रमुख चंद्रकांत रघुवंशी यांचे आवाहन

**नंदुरबार, दि.१८ (प्रतिनिधी)- जि.प. हा ग्रामपंचायतीच्या विकासाचा कणा आहे, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषदेसह येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढण्यासाठी कार्यकर्त्यांनी तयारी करावी. कार्यकर्त्यांनी संघटितपणे फळी निर्माण करावी त्याशिवाय यश मिळणार, हे लक्षात ठेवले पाहिजे, आगामी निवडणुकीच्या संदर्भात पक्ष नेतृत्वाच्याच्या निर्णय मान्य करूनच काम करण्यात येईल, गावितांना स्वतःच्या विजयाबद्दल खात्री नव्हती. एक है तो सेफ है, बटेंगे तो कटेंगे या भाजपाच्या घोषवाक्यांमुळे तारले, असे प्रतिपादन शिवसेना शिंदे सेनेचे संपर्क प्रमुख तथा माजी आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी केले.**



कृषी उत्पन्न बाजार समितीच्या म.ज्योतिबा फुले भाजीपाला मार्केट यार्डातील लिलाव शेडचे भूमिपूजन आ. राजेश पाडवी मुख्य बाजार आवारात डांबरीकरण व ओटे बांधकाम भूमिपूजन आ. शिरीषकुमार नाईक, कल्याणी पेट्रोल पंप जवळील शॉपिंग सेंटरसह गोडाऊनचे भूमिपूजन आ. आमश्या पाडवी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख ॲड. राम रघुवंशी, नंदुरबार कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती संध्या पाटील, उपसभापती गोपीचंद पवार, शहादा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अभिजीत पाटील, जि.प माजी अध्यक्ष वकील पाटीत जि.प माजी सदस्य विजयसिंह पराडके, पं.स माजी सभापती अंजना वसावे, सामाजिक कार्यकर्ते इंजि. किरण तडवी, माजी सभापती विक्रमसिंह कळवी, शेतकी संघाचे अध्यक्ष बी. के पाटील, जि.प माजी सदस्य देवमन पवार, शिवसेना तालुकाप्रमुख डॉ.सयाजीराव मोरे, पं.स माजी उपसभापती जगा पवार, भाजीपाला असोसिएशनचे अध्यक्ष विजय माळी उपस्थित होते. यानंतर संजय टाऊन हॉलमध्ये झालेल्या कार्यक्रमात माजी आ.चंद्रकांत रघुवंशी बोलत होते. ते पुढे म्हणाले, कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी केंद्र सरकारच्या योजनेतून ३० टक्के अनुदान आहे. त्यात ६७ टक्के बाजार समितीच्या हिस्सा असून शेतक यांच्या विकासासाठी जिल्हा नियोजन समितीतून बाजार समितींना निधी मिळावा यासाठी आ.राजेश पाडवी, आ. शिरीषकुमार नाईक आ. आमश्या पाडवी यांनी प्रयन करावेत. भरत गावित व शिरीष नाईक या दोघांत वेल्डींग करण्यासाठी माझे प्रयल राहणार आहेत. असेही ते म्हणाले.

यावळी आ.आमश्या पाडवी यांनी माजी खा.हिना गावित यांच्यावर टीका केली. ते म्हणाले, हिना गावित यांच्या तिन्ही खासदारकीच्या निवडणुकीच्या वेळेस महायुतीच्या धर्म पाळत मी त्यांच्या प्रचार केला. परंतु, यंदाच्या निवडणुकीत त्यांनी महायुतीचा धर्म न पाळता माझ्या विरोधात निवडणूक लढवली आणि आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुक लढवायला सांगितल्याचे ते बोलत आहेत त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची बदनामी करीत आहेत. गावित फक्त निवडणुकीत वापर करून घेतात, गावितांनी दोनशे गाड्या घेवून नागपुर वाऱ्या केल्या . मात्र आम्ही चावी मारल्यानेच त्यांना मंत्रीपद मिळाले नाही.

आ.राजेश पाडवी म्हणाले, मागे झाले गेले ते विसरून जा. येणारा काळ हा आपला असून, पक्ष मतभेद बाजूला ठेवून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या जनतेसाठी लढू. गायी वाटप करतांना यापुढे २२ हजार रुपये लागणार नाहीत. गायीचे वाटप मोफत झाले पाहिजे. असा जिआर लवकरच पारीत होणार असल्याचे ते म्हणाले. माझ्या मतदार संघात कामे मंजूर झालेत परंतु एकही पैसा मिळाला नाही, येत्या स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत एकत्रित येत निवडणूक लढवू.

## पान १ वरुन

### इले.मोटारीचा शॉक, इसमाचा दुर्दैवी मृत्यू

येताच सर्व जण शेतातील विहिरीकडे पळाले. लाकडी दांडक्याच्या सहाय्याने त्याला बाजूला करण्यात आले आणि तातडीने हिरे वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले. उपचार सुरु असताना दुपारी पावणे तीन वाजेच्या सुमारास प्रदीप थोरात यांचा मृत्यू झाल्याचे डॉ. प्रकाश सुकळे यांनी घोषित केले.

### प्रसाद चौधरीला सोमवारपर्यंत पो.कोठडी

मास्टर माईंड आहे. याच्याच मोबाईलवरुन कर्जाची प्रक्रिया झाली आहे. यामुळे पोलीस कोठडी द्यावी अशी मागणी केली.

एल.सी.बी.चे पोलीस निरीक्षक श्रीराम पवार हे आज न्यायालयात समक्ष हजर होते. त्यांनी तपासात एक ओप्पो व चार सॅमसंग कंपनीचे महागडे मोबाईल आतापर्यंत मिळाले असल्याचे सांगितले. याच बरोबर खुशाल सोनारच्या तसेच आई व वडिलांचे तीन बँक बुक मिळाले असल्याचे सांगितले. ५० ते ६० जणांची संगनमताने फसवणूक झाली असल्याचे सांगितले.

प्रसाद चौधरी याच्या पोलीस कोठडीची मागणी करतांना तो फायनान्स कंपनीचा सेल्स ऑफिसर म्हणून नोकरी करीत आहे. त्याची व खुशाल सोनार यांची एकत्र फायनान्स कंपनीत काम करीत असतांनापासूनच ओळख आहे. कर्ज देतांना वापरण्यात आलेला मोबाईल हस्तगत करायचा आहे आदी सहा मुद्दे मांडून पोलीस कोठडीची मागणी केली. यावेळी न्यायालयाने येत्या २० जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

## निधन वार्ता

### शितल वारुडकर



धुळे, दि.१८-शहरातील पंचवटी परीसरातील मुळ रहिवासी व सध्या कोथरुड, पुणे येथे वास्तव्यास असलेल्या शितल श्रीकांत वारुडकर (७३) यांचे दि.१७ रोजी सकाळी कोथरुड, पुणे येथील निवास स्थानी आकस्मिक निधन झाले. त्यांचे पश्चात एक मुलगा, मुलगी सून, जावाई नातवंडे असा परीवार आहे. त्या धुळे एज्युकेशन सोसायटीच्या चितळे माध्यमिक विद्यालयाचे सेवानिवृत्त माजी मुख्याध्यापक कै.श्रीकांत वारुडकर यांच्या पत्नी तर तेजस व सोनल वारुडकर यांची आई होत.

### दुर्गाबाई जाधव



शिंदखेडा, दि.१८- येथील महादेव सॉमील मागील माळीवाड्यातील रहिवासी दुर्गाबाई सिताराम जाधव (८५) यांचे दि.१७ जानेवारी शुक्रवारी रात्री वृद्धापकाळमुळे निधन झाले. त्यांच्या पश्चात सुन, नातवंडे व नातसुना, पतवंडे असा परिवार आहे. त्या पुणेस्थित राहुल जाधव व ॲग्री मार्केटिंग अधिकारी ललित जाधव यांच्या आजी होत.

रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान

**न्यू फ्लॅट विकणे आहे**
SSVPS कॉलेज जवळ, सिद्धी व्यंकटेश अपार्टमेंट, प्रभात नगर येथील 2 BHK, 3 BHK फ्लॅट विकणे आहेत.
-: संपर्क :-
महेश माळी
9665696658

**खास लग्नसराईमध्ये**
आहेरासाठी भरपूर अनेक वस्तु आपले बजेटमध्ये!
साडीपीस १४०/- रु.
बेडसीट १२०/- रु.
ब्लँकेट भारी १२०/- रु.
या, पहा, खरेदी करा!
दुकानातील खरेदीवर डिस्काऊंट/गिफ्ट!
राकेश कापड दुकान
जे.बी.रोड, धुळे

सागवान लाकडाचे तयार दरवाजे चौकट फ्रेम, पॉलिश केलेले सागवान शटर्स, फ्लश डोअर, कोटींग दरवाजे, फायबर दरवाजे, RCC सिमेन्टचे कलर चौकट व खिडकी तसेच प्लास्टो कंपनीची पाण्याची टाकी इ.
उत्तम क्वॉलिटी व वाजवी रेटमध्ये मिळण्याचे एकमेव ठिकाण..



शंकर विजय सॉ मिल
प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे.
मो. 9595397718, 9665886722

**दुकान भाडे कराराने देणे**
ग.नं.६ मधील १३X५४ ऑफिस, बँक व फायनान्ससाठी दुकान भाडे कराराने देणे आहे.
-: संपर्क :-
7498644970

**घर विकणे आहे**
वाडीभोकर रोड, श्रीराम नगर येथील ८ रुमचे दुमजली घर विकणे आहे.
-: संपर्क :-
9322009279

**पाहिजेत**
आकऊन्टींगचा कामासाठी हुशार व अनुभवी मुलगा किवा मुलगी पाहिजे.
साईबाबा रेडीमेड ॲण्ड होजेअरी
गल्ली नं.२, मुल्लाबाडा रोड अकबर चौक, धुळे
मो.नं.९४२२२८६९५८ ७३५०१४८९५५

**RB प्रॉपर्टीज**
ग.नं.५, नवा कॉम्प्लेक्स मध्ये १०/१६ व १०/२४ दुकान विकणे आहेत. इतर गल्लीमध्ये छोटी मोठी जागा विक्रीस आहेत.
-: संपर्क :-
8421141247

**प्लॉट विकणे आहे**
अरुणकुमार वैद्य नगर येथे २ रोड कॉर्नर DP रोडटच प्लॉट विकणे आहे.
-: संपर्क :-
7391055331

**शेती विकणे आहे**
आनंदखेडे-उडाणे रोडवरील रोडटच २२ एकर बागायती शेती विकणे आहे. ३ विहीर, शेड कांदाचाळ, रुम आहेत.
-: संपर्क :-
7391055331

**पाहिजेत**
होलसेल मेडीकल दुकानामध्ये कामासाठी मुले पाहिजेत. अनुभव असल्यास प्राधान्य.
-: संपर्क :-
तेजस डिस्ट्रीब्युटर्स
गल्ली नं.५, धुळे
8888096777

**घर भाड्याने देणे**
२४ तास पाणी (बोअरिंग/मनपा.), ३ रुम, संडास/बाथरूम, बस स्थानक, रेल्वे स्टेशन, बाजारपेठ दोन मिनिटावर...
-: संपर्क :-
9420659211
8830672162

**प्लॉट विकणे आहे**
सर्व्हे नं. ९१, प्लॉट नं. २४ माहेश्वरी सोसायटी ८५० स्के. फुट नकाणे रोड साईबाबा मंगल कार्यालय जवळ, धुळे.
-:संपर्क :-
रमेश गंगाराम साळवे
मो. ७०६६५५९४५५, ९४२२२८८९४८

**पाहिजेत**
हेल्पर - ४
सुपरवायझर - २
समक्ष भेटा! स.११ ते १
अशोका केमीकल वर्क्स
ई-५७, एमआयडीसी, अवधान, धुळे
9175068478

सेल! सेल!! सेल!!!
70% 50% 30% डिस्काऊंट सेल
फस्टक्राय स्टोर
ड्रेसेस व फूटवेअर वर चालू आहे!
तरी या सुवर्णसंधीचा लाभ घ्या!!
पत्ता : घ.नं.२८५६, जे.बी.रोड, शिवाजी मेडीकल समोर, धुळे
फो.नं.०२५६२-३५६५३७

**डॉक्टर पाहिजे**
मुकटी येथे (ता.जि.धुळे) मेनरोडवर दवाखान्याचा पूर्ण सेटअप रेडी आहे.
intrested Doctor ने संपर्क करावा.
-: संपर्क :-
7744009966
(जैन राहुल)

LG Life's Good



बँकेच्या क्रेडीट कार्डवर EMI सुविधा उपलब्ध !
BAJAJ FINSERV HDB FINANCIAL SERVICES
0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
फायनान्सला लागणारी कागदपत्रे 1) पॅनकार्ड 2) आधार कार्ड 3) बँक पासबुक व चेक
नियम व अटी लागू*
ak media- 238222
57 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-४००४११५, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०